स्थापना
१ मे १९५७

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे – ४११०३७
www.puneapmc.org / Email : kubspune37@rediffmail.com

जा. क्र. विकसन / वीजतंत्री / वा. दे.दु. वि.पं. व स्टा. / दरपत्रके/४९८८ /२४-२५ दि. १८/३/२०२५

## प्रसिद्धीपत्रक

**विषय :-** संस्थेच्या मुख्य व उपबाजारातील पाण्याचे विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर यांचे देखभाल-दुरुस्तीचा नॉन-कॉन्प्रेसिव्ह वार्षिक ठेक्याचे दरपत्रक सादर करणेबाबत.

वरील विषयास अनुसरून पाण्याचे विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर दुरुस्त करणारे ठेकेदार /विद्युत ठेकेदार यांना या प्रसिद्धीपत्रान्वये कळविण्यात येते कि, कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणेच्या मुख्य व उप बाजार आवारातील एकूण २३ पाण्याचे विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर नॉन-कॉन्प्रेसिव्ह देख-भाल दुरुस्तीचा वार्षिक ( सन २०२५-२६ करिता) ठेका देणेकामी दरपत्रके मागवित आहोत.

संस्थेच्या पाण्याचे विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर प्रत्यक्ष जागेवर जाऊन पहाणी करून खालील नियम व अटीचे अधीन राहून आपले कमीत कमी दराचे दरपत्रक सीलबंद पाकिटामध्ये दिनांक १८ / ३ /२०२५ ते दिनांक २८/ ३ /२०२५ अखेर दु. ४.०० वाजेपावेतो बाजार समितीच्या गुलटेकडी मार्केटयार्ड येथील मुख्य बाजार आवारातील फळे-भाजीपाला विभागाचे वीजतंत्री कार्यालयात पोहोच करावी.

**नियम व अटी :-**

१. मुख्य व उपबाजार आवारातील पाण्याचे विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करूनच दरपत्रक सादर करावे.
२. मुख्य व उपबाजार आवारातील पाण्याचे विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर नादुरुस्त झाल्यास त्यांची दुरुस्ती संबंधित ठेकेदारानेच करावयाची आहे.
३. दरपत्रकामध्ये फर्मचा जी.एस.टी. क्रमांक, फर्मचा पत्ता, दूरध्वनी क्रमांक, नमूद करावा.
४. दरपत्रकामध्ये मूळदर अधिक जी.एस.टी. याप्रमाणे दर नमूद करावेत तसेच दरपत्रकामध्ये कामाचा एच. एस. एन. कोड नमूद करणे आवश्यक आहे.
४. मुदतीनंतर आलेली दरपत्रक स्वीकारले जाणार नाहीत. याची नोंद घ्यावी.
५. आलेली दरपत्रक उघडते वेळी सबंधित मेकॅनिकल / ठेकेदार अथवा त्यांचे प्रतिनिधीने बाजार समितीचे मुख्य कार्यालयामध्ये वेळेत उपस्थित रहावे.
६. कोणतेही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समितीने राखून ठेवला आहे.
७. चार महिन्यातून एक वेळेस वीजतंत्री कर्मचारी यांचे समक्ष सर्व विद्युत पंपाची व त्यांचे स्टार्टरची तपासणी करून आवश्यक तो आहवाल सादर करावा लागेल. तसेच विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर तपासणीला येणे-जाण्याचा प्रवास भत्ता बाजार समितीकडून दिला जाणार नाही.
८. मुदतीत प्राप्त झालेली दरपत्रके दि. १ / ४ / २०२५ रोजी दुपारी ४.०० वा. संस्थेच्या मुख्य कार्यालयातील मा. सहसचिव यांचे दालनात दरपत्रके सीलबंद असलेची खात्री करून उघडणेत येतील.
९. आलेली दरपत्रके उघडणेचे वेळेत बदल झाल्यास दरपत्रकधारकांना वेळेत बदल झाल्याचे दूरध्वनीद्वारे कळविणेत येईल याची नोंद घ्यावी.
१०. नियम व अटी मान्य असणा-या पाण्याचे विद्युत पंप व त्यांचे स्टार्टर दुरुस्त करणारे ठेकेदार व मेकॅनिकल यांनी संबंधित कामाची दरपत्रके सादर करावीत.

**मा. सभापती साहेब यांचे मान्यतेने**

सचिव
कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३/२४२६२३४९/२४२७२८८७